नियमीत दिवाणी दावा क्रमांक ०५/२०२३
पुष्पाबाई प्रल्हाद जाधव व इतर वि. निवृत्ती शिवराम सुरवसे

**MHLA130000142023**

**निशाणी क्रमांक ५ वरील आदेश**
**आदेश पारीत दिनांक १३/१०/२०२३**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने प्रतिवादीविरुध्द प्रस्तुत दाव्याचा निकाल होईपर्यंत दावा मिळकतीवर तुर्तातुर्त ताकीद मागण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ नुसार दाखल केला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे आहे की...**

०२. प्रतिवादी क्रं १ हे वडील व प्रतिवादी क्रं २ व ३ हया वादींच्या बहीणी असुन वादी व प्रतिवादी एकत्र हिंन्दु कुटुंबाचे सदस्य असुन त्यांना मिताक्षरा तत्वे लागू होतात. वादी व प्रतिवादींमध्ये वडीलोपार्जीत मिळकतीची वाटणी झालेली नाही. प्रतिवादी क्रं १ च्या वडीलांना प्रतिवादी क्रमांक १ व ज्ञानोबा शिवराम सुरवसे अशी मुले होती. प्रतिवादी क्रमांक १ च्या वडीलांनी सन १९७० मध्ये गणपती पांडा सुरवसे व इरप्पा रामनाथ सुरवसे यांच्या समवेत सव्हे क्रमांक ५९-ए मौजे रेणापूर येथील ६ एकर ७ गुंठे जमीन नोंदणीकृत खरेदीखत क्रमांक २४१२/६९ दिनांक १२/०५/१९७० मिळकत ही एकत्रीतपणे खरेदी केली व त्याप्रमाणे ७/१२ वर फेर फार क्रं.३३७ नुसार नोंद झाली.

०३. सन १९७१ मध्ये प्रतिवादी क्रमांक १ यांच्या वडीलांनी प्रतिवादी क्रमांक १ व त्यांचा दुसरा मुलगा ज्ञानोबा यांच्यामध्ये वाटणी केली. सदर वाटणीमध्ये प्रतिवादी क्रमांक १ चे वडील यांनी इरप्पा रामा सुरवसे यांच्याकडुन ६ एकर ७ गुंठे जमीनीपैकी २ एकर २ गुंठे जमीन प्रतिवादी क्रमांक १ यांच्या नावे नोंदणीकृत खरेदीखत क्रमांक ३९३/१९७१ दिनांक १२/०२/१९७१ रोजी खरेदी करुन प्रतिवादी क्रंमाक १ याच्या वाटणीस दिली. त्याप्रमाणे ७/१२ उता-यावर फेरफार क्रमांक ३३८ प्रमाणे नोंद झाली. त्यानंतर गट क्रमांक ५९-अ, मधील २ एकर २ गुंठे जमीन प्रतिवादी क्रमांक १ चे वडीलांनी त्यांच्या नावे खरेदी असलेली त्यांचा दुसरा मुलगा ज्ञानोबा यास दिली. सदर

वाटणीप्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ हा दावा मिळकतीचा मालक व कब्जेदार झाला.

०४. त्यानंतर प्रतिवादी क्रमांक १ ने वडीलोपार्जीत शेतीतील उत्पन्नातुन मौजे रामवाडी खुर्द ता. रेणापूर येथे घरजागा मिळकत क्रमांक ग्रा.पं. घर क्रमांक २०१ खरेदी केली. त्यामुळे दोन्ही दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जीत एकत्र कुटुंबाच्या मिळकती असुन त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचा १/६ एवढा हिस्सा आहे. दावा मिळकतीवर प्रतिवादी क्रमांक १ चे नाव असल्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्रं २ व ३ यांच्याशी संगणमत करुन दावा मिळकतीवर त्रयस्त व्यक्तीचे विभाजनाद्वाने हक्क निर्माण करण्याचा प्रयत्न करुन वादींचा दावामिळकतीतील कायदेशीर अधिकार डावलण्याचा प्रयत्न करीत आहेत. दिनांक १२/१२/२०२२ रोजी वादींचा दावा मिळकतीवरील हिस्सा प्रतिवादीवांदीनी नाकारला त्यामुळे सदरचा दावा दाखल करण्यात आला असुन वादी यांनी प्रतिवादी यांनी सदर दाव्याचा निकाल अंतिम गुणदोषांवर होईपर्यंत दावा मिळकती (दाव्याच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद मिळकती) कोणत्याही प्रकारे ति-हाईत इसमांस विकु नये अगर अन्य कोणत्याही मार्गाने तबदील करु नये, अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी हि विनंती केली आहे.

**<u>प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे थोडक्यात म्हणणे...</u>**

०५. प्रतिवादी यांनी निशाण क्रमांक १८ वर पुरसीस दाखल करुन नि.क्रं १६ वर दाखल केलेला जबाबदावा हाच सदर अर्जाकरीता म्हणणे समजण्यात यावे अशी विनंती केली आहे. प्रतिवादींनी वादींसोबतचे नाते मान्य करुन वादी व प्रतिवादी हे एकत्र कुटुंबाचे सदस्य असल्याचे मान्य केले आहे. परंतू प्रतिवादींनी वादींच्या अर्जातील सर्व कथने नाकारली आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकती हया प्रतिवादींच्या स्वकष्टार्जीत मिळकती असुन त्यांनी वादी व प्रतिवादींमध्ये वाटणी झाल्याचे नाकारले आहे.

०६. परिच्छेद क्रं. २-अ मधील मिळकत ही प्रतिवादी क्रमांक १ यांच्या स्व

उत्पन्नातुन खरेदी केलेली आहे. त्यामुळे सदरची मिळकत ही त्याची स्वकष्टीर्जीत मिळकत असुन त्यामध्ये वादींना त्याच्या हयातीमध्ये वाटणी मागता येणार नाही. तसेच परिच्छेद क्रमांक २-ब मधील मिळकत ही प्रतिवादी क्रमांक १ ची स्वकष्टार्जीत मिळकत आहे. वादी हया त्यांच्या पतीच्या सांगण्यावरुन प्रतिवादी क्रमांक १ कडुन रक्कम मिळविण्याकरीता सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी क्रमांक २ व ३ हया प्रतिवादी क्रमांक १ च्या विवाहीत मुली असुन आणि त्या त्यांच्या सासरी राहत आहेत.

०७. प्रतिवादी क्रमांक १ हा दावा मिळकतीचा एकमेव मालक व कब्जेदार आहे. त्यामुळे त्यास दावा मिळकतीबाबत त्याच्या इच्छेप्रमाणे निर्णय घेण्याचा अधिकार आहे. वादींचा दावामिळकतीमध्ये कोणताही हक्क व अधिकार नाही. सबब सदरचा अर्ज दहा हजार रुपये दंड वादीवर बसवुन नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०८. पुढील बाबी माझे विचारार्थ उपस्थित होत असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.-

| | **विचारार्थ बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींच्या बाजूने प्रथम दर्शनी दावा आहे काय ? | **नाही.** |
| २. | दाव्याचा तूळ/कल वादींकडे आहे काय ? | **नाही.** |
| ३. | तुर्तातुर्त मनाई आदेश न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | **नाही.** |
| ४. | आदेश काय ? | **अर्ज नामंजुर करण्यात येतो.** |

## -: का र ण मि मां सा :-

०९. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावर दाखल कागदपत्राचे अवलोकन केले.

१०. वादीचे विद्वान विधीज्ञ श्री. बलराज रेडडी यांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकती एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा

मिळकतींचे सरस-निरस मानाने वाटप झालेले नाही. प्रतिवादी वादी यांना कोणताही हिस्सा दिला नाही. दि. १२/१२/२०२२ रोजी वादींनी प्रतिवादींकडे आपला १/६ हिस्सा मागितला. परंतू, प्रतिवादी यांनी हिस्सा देण्याचे नाकारले. आजमितीस दावा मिळकती ७/१२ सदरी प्रतिवादींच्या नावे आहेत. वादींचा दावा मिळकतींवरील हिस्सा डावलण्याकरीता प्रतिवादी हे दावा मिळकती त्रयस्त इसमास विकण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामत: सदरचा दावा प्रलंबीत असताना दावा मिळकती प्रतिवादी त्रयस्त इसमांस तबदील अगर हस्तांतरण केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. उलटपक्षी, प्रतिवादींविरूध्द तुर्तातुर्त ताकिदीचा आदेश दिल्यास त्यांचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही.

११. प्रतिवादींचे विद्वान विधीज्ञ श्री. आर.टी.कांबळे यांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकती हया प्रतिवादी क्र. १ च्या स्वकष्टार्जीत मिळकती असुन वादींचा त्यामध्ये कसलाही हक्क व अधिकार नाही. वादी हया त्यांच्या पतींच्या सांगण्यावरुन प्रतिवादी क्रमांक १ कडुन रक्कम मिळवण्यासाठी खोटा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्रं १ हा दावा मिळकतीचा एकमेव मालक व कब्जेदार आहे. त्यामुळे वादींना दावा मिळकतीची वाटणी प्रतिवादी क्र.१ च्या हयातीमध्ये मागता येणार नाही. सदरचा अर्ज दंडासह नामंजूर करण्याची विनंती केली.

१२. वादींनी दावा मिळकतीची वाटणी झाली नसल्याचे नमुद केले आहे. तर प्रतिवादींनी सदरची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. वादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जीत मिळकत आहे. मात्र प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतही प्रतिवादी क्र. १ ची स्वःकष्टार्जीत मिळकत आहे. अभिलेखावरील दाखल कागदपत्राचे अवलोकन केले असता परिच्छेद क्र. २अ मधील मिळकत ही प्रतिवादी क्र. १ ने सन १९७५ मध्ये इराप्पा राम सुरवसे यांच्याकडुन खरेदी केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच सदर मिळकतीच्या ७/१२ उता-यावर प्रतिवादी क्र. १ चे

नाव असल्याचे दिसुन येते. तसेच परिच्छेद क्र. २ब मधील मिळकतीच्या गाव नमुना क्र. ८ च्या उता-यावर प्रतिवादी क्र. १ चे नाव असल्याचे दिसुन येते. वादींनी प्रतिवादी क्र. १ च्या वडीलांनी प्रतिवादी क्र. १ च्या नावे २ एकर २ गुंठे जमीन नोंदणीकृत खरेदीखता द्वारे खरेदी केल्याचे नमुद केले आहे. परंतु सदरच्या बाबी पुष्ठयर्थ वादींनी कोणतेही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. तसेच प्रतिवादी क्र. १ च्या वडीलांनी प्रतिवादी क्र. १ च्या नावे सदरची मिळकत का खरेदी केली याचेही संयुक्तीक कारण नमुद केलेले नाही. प्रतिवादींनी नि.क्र. १९ वर प्रतिवादी क्र. १ चे बंधु नामे ज्ञानोबा शिवराम सुरवसे यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर शपथपत्रामध्ये त्यांनी वादी व प्रतिवादी यांच्या सोबतचे नाते संबंध स्पष्ट करुन दावा मिळकती बद्दल माहिती असल्याचे नमुद केले आहे. तसेच त्यांनी त्यांच्या शपथपत्रामध्ये दावा मिळकती बाबत मिळकती हया प्रतिवादी क्र. १ च्या स्वःकष्टार्जीत मिळकती असल्याचे नमुद केले आहे. अभिलेखावरील दाखल कागदपत्रावरुन दावा मिळकती हया प्रतिवादी क्र. १ च्या स्वःकष्टार्जीत मिळकती असल्याचे प्रथमदर्शणी दिसुन येते.

१३. तसेच वादींनी वाटणी पश्चात प्रतिवादी क्र. १ ने परिच्छेद क्र. २ब मधील नमुद घर मिळकत ग्रा.पं. क्रमांक २०१, मौजे रामवाडी ता. रेणापुर जि. लातूर ही मिळकत वडीलोपार्जीत शेतीतुन आलेल्या उत्पान्नातुन खरेदी केल्याचे नमुद केले आहे. परंतु सदर उत्पन्नाबाबत कोणतेही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. तसेच प्रतिवादी क्र. १ ला सदर वडीलोपार्जीत शेत जमीनीमधुन किती उत्पन्न मिळत होते व परिच्छेद क्र.२ब मधील घर जागा मिळकत ही किती किंमतीला व कोणाकडुन प्रतिवादी क्र. १ ने खरेदी केली या बाबत काहीही नमुद केले नाही. त्यामुळे केवळ कथनाच्या आधारे वादींचे म्हणणे स्वीकारार्ह वाटत नाही. उपरोक्त बाबींचा विचार करता परिच्छेद क्र. २ब मधील नमुद मिळकत ही प्रतिवादी क्र. १ ने वडीलोपार्जीत शेतजमीनीच्या उत्पन्नातुन खरेदी केली हे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही.

१४. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की,

प्रतिवादी क्र. १ हा दावा मिळकतीचा मालक व कब्जेदार असुन सदर दावा मिळकती त्यांच्या स्वकष्ठार्जीत आहेत. वादींनी सदर वाटणीच्या दाव्याद्वारे दावा मिळकती हया वडीलोपार्जीत असुन त्यामध्ये त्यांनी त्यांचा हिस्सा मागीतलेला आहे. परंतु, अभिलेखावरील दाखल कागदपत्रावरुन दावा मिळकती हया प्रतिवादी क्र. १ च्या स्वकष्ठार्जीत मिळकती असल्यामुळे वादींना दावा मिळकतीमध्ये हिस्सा मागता येत नाही असे प्रथमदर्शनी दिसते. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथने शाबीत करण्याकरीता सबळ पुराव्याची आवश्यकता आहे. दोन्ही बाजुंना पुराव्याची संधी देवुन दाव्यामध्ये योग्य तो निष्कर्ष काढता येवु शकतो. दाव्याच्या या टप्पयावर वादीने त्यांची बाजु प्रथमदर्शनी सिध्द केली किंवा नाही एवढेच पाहता येते. करिता मी विचारार्थ बाबी क्र. १ ते ३ यांचा नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

१५. या सर्व कारणामुळे वादींचा दावा प्रथम दर्शनी दिसुन येत नाही व त्यामुळे न्यायाचा तराजु प्रतिवादींच्या बाजुने झुकतो. म्हणून प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यत वादींनी विनंती केल्या प्रमाणे प्रतिवादींच्या विरुध्द वादींच्या हक्कात तुर्तातूर्त ताकीदीचा आदेश पारीत करणे न्यायोचित होणार नाही. सबब, मी विचारार्थ बाब क्र. १ ते ३ चे निष्कर्ष वरीलप्रमाणे नोंदवून खालील आदेश पारीत करीत आहे.-

**<u>विचारार्थ बाब क्र. ४ :-</u>**

१६. वरील कारणमिमांसा लक्षात घेऊन न्यायोचित होईल असा खालील आदेश पारीत करीत आहे.-

**<u>-: आ दे श :-</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

( के.के.वाघमारे )
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रेणापूर

दिनांक : १३/१०/२०२३